| MHWS090008372025 | दाखल दिनांक : २२.०७.२०२५<br>नोंदणी दिनांक : २२.०७.२०२५<br>निकाल दिनांक : ०७.०५.२०२६<br>कालावधी : **००** व.,**०९**म., **१५** दि. |
|---|---|

**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २), मानोरा यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारीः श्रीमती तृष्णा गो. बन्सोड)

**नियमित फौजदारी खटला क्र. ११२/२०२५** **निशाणी क्र.–५५**

गुन्हयाचा तपशिल

गुन्हा क्र. : ७४/२०२५

पोलीस स्टेशन : आसेगांव पोलीस स्टेशन, मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी, आसेगांव तालुका पोलीस स्टेशन, मानोरा. |
| अभियोगपक्षातर्फे | विशेष सहा. सरकारी अभियोक्ता– श्री. एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | अनिल उत्तम पवार व इतर |
| आरोपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ श्री. आर. जी. मांग |

**<u>गुन्हयाचा तपशिल</u>**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ११/०५/२०११ ते २१/०३/२०२५ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | ०५/०४/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १८/०७/२०२५ |
| दोषारोप निश्चित तारीख | २०/०१/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०७/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी – कलम ४६८ भा.ना.सु.सं प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३.<br>४.<br>५.<br>६.<br>७. | **अनिल उत्तम पवार**<br>वय :३४ वर्ष, धंदा:मजुरी<br>**दुरीबाई उत्तम पवार**<br>वय :६४ वर्ष, धंदा:मजुरी<br>**रविंद्र उकंडा राठोड**<br>वय :४२ वर्ष, धंदा:मजुरी<br>**सौ. अर्चना रविंद्र राठोड**<br>वय :३५ वर्ष, धंदा:मजुरी<br>**उकंडा रामु राठोड**<br>वय :६५ वर्ष, धंदा:मजुरी<br>**सुनिल उत्तम पवार**<br>वय :४० वर्ष, धंदा:मजुरी<br>**कबिरदास रामधन पवार**<br>वय :७५ वर्ष, धंदा:मजुरी<br>सर्व रा. ग्राम–वटफळ ता.मानोरा, जि.वाशिम. | कलम ३५(३) भा.ना.सु.सं , २०२३ प्रमाणे समजपत्र दिले. | २९/०४/ २०२५ | भा.न्या.सं. कलम ८५, ११५(२), ३५२,३५१ (२)(३) सहकलम ३(५) अन्वये | निर्दोष सोडले | -- | -- |

## न्या य नि र्ण य

(पारित केल्याचा दिनांक ०७/०५/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ८५, ११५(२), ३५२,३५१(२)(३) सहकलम ३(५) नुसार न्यायप्रविष्ठ आहे.

**<u>सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की</u>,**

२. फिर्यादी नामे ममता अनिल पवार हि आ.क्र.१ ची पत्नी व इतर आरोपी हे तिचे पतीचे नातेवाईक आहेत. तिचे लग्न आ.क्र.१ सोबत दि.११/०५/२०११ रोजी झाले. लग्नानंतर फिर्यादी आरोपींचे घरी एकित्रित कुटुंबात नांदावयास गेली. लग्नानंतर आरोपींनी तिला दोन वर्षापर्यंत चांगली वागणुक दिली. त्यानंतर वडीलांकडून मोटर सायकल घेण्यासाठी माहेरवरुन पैसे आणण्याचे कारणावरुन तिला शारिरीक व मानसिक त्रास देणे सुरु केले व तिला मारहाण करुन माहेरी पाठवून दिले. फिर्यादीचे वडीलांनी आ.क्र.१ यास मोटर सायकल घेवून दिली व समाजातील पंचांसमक्ष आपसी समझौता लिहून घेवून फिर्यादीस सासरी नांदावयास पाठवून दिले. परंतु नंतर आ.क्र.१ याने चारचाकी डिझायर गाडी घेण्याकरीता फिर्यादीचे वडीलांना ५ लाख रुपयाची मागणी केली. परंतु फिर्यादीच्या वडीलाने नकार दिला असल्याने आ.क्र.१ ने फिर्यादीस मारहाण करुन शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली. इतर आरोपींनी आ.क्र.१ यास फिर्यादीस मारण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्या अनुषंगाने फिर्यादीने घडलेल्या घटनेबाबत आसेगांव पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली.

३. पोलीसांनी आरोपींविरुध्द गुन्हा क्र.७४/२०२५ प्रमाणे भारतीय न्याय संहिताचे कलम ८५, ११५(२), ३५२, ३५१(२)(३) सहकलम ३(५) अन्वये गुन्हा नोंदविला. तपासी अंमलदार यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम ८५, ११५(२), ३५२, ३५१(२)(३)सहकलम ३(५) नुसार नि.क्र.४० वर दोषारोप निश्चित केले. आरोपींना दोषारोप वाचुन व समजावून सांगितला असता त्यांनी तो अमान्य केला व प्रकरण सुरु ठेवण्याची तयारी दर्शविली. आरोपीची जबानी निशाणी क्र.४७ वर आहे. सरकारपक्षाने आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी केवळ एक साक्षीदार, सा.क्र.१ फिर्यादी ममता अनिल पवार यांना नि.क्र.५० वर तपासले आहे. वि.स.स.अ. यांनी पुढे कोणतेही साक्षीदार तपासायचे नसल्याचे सांगितले. त्या अनुषंगाने आदेश नि.क्र.१ वर आदेश पारीत करण्यात आला. आरोपींविरुध्द

पुरक पुरावा उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे, कलम ३५१ नुसार बयाण नोंदविण्यात आले नाही.

५. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

६. सरकार पक्षाचे हकीकत व आरोपीचा बचाव यावरुन निराकरणासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष, कारणमीमांसासह खालीलप्रमाणे आहेः–

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करते काय की दिनांक ११/०५/२०११ ते तक्रार दाखल करेपर्यंत ग्राम–वटफळ, ता.मानोरा, जि.वाशिम येथे आरोपींनी आपसी संगणमताने फिर्यादी सौ. ममता अनिल राठोड हिच्याकडे रुपयांची मागणी करुन तिला शारिरीक, मानसिक छळ केला व तिला क्रुर वागणुक दिली व तसे करुन भारतीय न्याय संहिताचे कलम ८५ सहकलम ३(५) अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| २. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगणमताने फिर्यादी हिला इच्छापूर्वक मारहाण करुन दुखापत केली व तसे करुन भारतीय न्याय संहिताचे कलम ११५ (२) सहकलम ३(५) अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ३. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगणमताने फिर्यादीला शांतता भंग करुण अपमान केला व तसे करुन भारतीय न्याय संहिताचे कलम ३५२ सहकलम ३(५) अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ४. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगणमताने फौजदारी | **...नाही** |

| | | |
|---|---|---|
| | स्वरुपाचा धाकदपटशा करुन फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिली व तसे करुन भारतीय न्याय संहिताचे कलम ३५१(२)(३) सहकलम ३(५)अन्वये गुन्हा केला ? | |
| ५. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ बाबतः–</u>**

**७.** वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेकरीता एकत्रीत विचारात घेण्यात येत आहे. सा.क्र.१ फिर्यादी ही या प्रकरणातील मुळ फिर्यादी साक्षीदार असुन त्यांनी नि.क्र.४० वर कथन केले की, आ.क्र.१ तिचा पती असून इतर आरोपी आ.क्र.१ चे नातेवाईक आहेत. तिचे लग्न आ.क्र.१ सोबत वर्ष २०११ मध्ये झाले होते. लग्नापासून तिला एक मुलगा व एक मुलगी आहे. लग्नानंतर ती आरोपींचे घरी नांदावयास गेल्यानंतर आरोपींसोबत तिची बोलचाल झाली होती. याव्यतिरीक्त आणखी काही झाले नव्हते. रागाच्या भरात तिने आरोपींविरुद्ध तक्रार नि.क्र.५१ व ५२ दाखल केली. सदरील साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा उलटतपास घेतला. उलटतपासात या साक्षीदाराकडून अभियोगपक्षास अनुकूल अशी कोणतीही बाब अभिलेखावर आली नाही. सदरील साक्षीदाराने तिचे उलटतपासात आरोपीसोबत न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाल्याचे मान्य केले. आपसी समझोता नि.क्र.३१ व ३२ वर आहे. फिर्यादी हिने आरोपींनी रुपयांची मागणी केल्याचे, क्रुर वागणुक देवून तिचा अपमान केल्याचे तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत तिने काहीही कथन केलेले नाही. फिर्यादीने कथीत घटनेची बाब स्पष्टपणे नाकारली आहे म्हणून त्यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवता येत नाही.

**<u>मुद्दा क्रमांक ५ बाबतः–</u>**

८. वरील सर्व बाबींची तुलनात्मक पडताळणी केली असता असे दिसून येते की, आरोपींनी कथित घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादीस क्रुर वागणुक देवून रुपयांची

मागणी केल्याची, तसेच तिचा अपमान करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याची बाब निःसंदेहपणे सिध्द झालेली नाही. अभियोगपक्षाने भारतीय न्याय संहिताचे कलम ८५, ११५(२), ३५२, ३५१(२)(३) सहकलम ३(५) मधील घटकांची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे आरोपींना दोषी ठरविता येत नाही, म्हणुन आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. करीता वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.५ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**१.** आ.क्र.१ **अनिल उत्तम पवार,** आ.क्र.२ **दुरीबाई उत्तम पवार,** आ.क्र.३ **रविंद्र उकंडा राठोड,** आ.क्र.४ **सौ. अर्चना रविंद्र राठोड,** आ.क्र.५ **उकंडा रामु राठोड,** आ.क्र.६ **सुनिल उत्तम पवारकबिरदास रामधन पवार** यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७१ नुसार भारतीय न्याय संहिताचे कलम ८५, ११५(२), ३५२, ३५१(२)(३) सहकलम ३(५) अंतर्गत शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२.** आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

**३.** आरोपी यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ च्या पुर्ततेकरीता जमानत दाखल करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.05.07 18:10:50 +0530

मानोरा
दि. ०७/०५/२०२६

**( तृष्णा गो. बन्सोड)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
( न्यायालय क्र.२), मानोरा,

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | | Smt. R. K. Chavhan (L.G.) |
| Court | | (Smt. T. G. Bansod)<br>Jt. CJJD & JMFC, Manora. |
| Date of Judgment/Order | | 07/05/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | | 07/05/2026 |
| Judgment/Order uploaded on | | 07/05/2026 |